# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक: एमआयएस-०१२१/सी.आर.११/२०२१/२३ दिनांक: १ मार्च, २०२१

## प्रसिध्दीपत्रक

विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या टोल फ्री क्रमांकाबाबत

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित विविध भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जप्रणाली अथवा सर्वसाधारण प्रकारच्या अडचणी/शंका निवारणासाठी आयोगाकडून **१८००-१२३४-२७५** आणि **१८००-२६७३-८८९** या टोल फ्री क्रमांकावर मदत केंद्र (Helpdesk/Call Centre) ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत टोल फ्री क्रमांकावर सद्यस्थितीत खालील मुद्यांच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध होऊ शकेल:-

(१) ऑनलाईन अर्जप्रणाली अथवा सर्वसाधारण स्वरुपाच्या अडचणी / शंकाचे निवारण.

(२) ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या अनुषंगाने तांत्रिक/सर्वसाधारण पात्रता अथवा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेबाबतच्या अडचणींचे निवारण.

**३.** उपरोक्त टोल फ्री क्रमांकावर प्राप्त होणारे दूरध्वनी संभाषणाचे (Telephone Calls) आयोगाच्या कार्यालयाकडून संनियंत्रण व विश्लेषण केले जाईल.

**४.** प्रस्तुत टोल फ्री क्रमांक दिनांक २ मार्च, २०२१ पासून खालील वेळापत्रकानुसार कार्यान्वित राहील:-

| | |
|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | सकाळी ९.०० ते रात्री ८.०० |
| शनिवार व रविवार | सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० |

**५.** टोल फ्री क्रमांकाच्या सुविधेव्यतिरिक्त उमेदवारांना support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर तांत्रिक बाबींच्या अनुषंगाने संपर्क साधता येईल.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग